# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


क्रमांक: 2अ/एडीएम/2013/ 9399

दिनांक: 7 JUL 2014

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानीत व अल्पसंख्यांक संस्थांच्या संस्थास्तरावरील आणि अल्पसंख्यांक कोटयातील प्रवेशासाठी गुणवत्ता यादीच्या अनुषंगाने प्रोसेसिंग शुल्क भरण्याबाबत....

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून राज्यातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश राष्ट्रीय पातळीवर घेण्यात येणा-या संयुक्त प्रवेश परीक्षेच्या (Joint Entrance Exam) आधारे करण्यास शासन निर्णय क्र.संकीर्ण-2011/प्र.क्र.337/तांशि-4, दि.31.10.2012 अन्वये मान्यता देण्यात आली असून मुद्दा क्रमांक 2 मध्ये शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-2011/प्र.क्र.337/तांशि-4, दि.24 जून 2014 अन्वये सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात येऊन त्यानुसार गुणवत्तेवर प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. याकरिता संचालनालयाने संकेतस्थळावर अनुसरावयाची कार्यपध्दती उपलब्ध करून दिलेली आहे.

या अनुषंगाने सीबीएसई, आयसीएसई व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ या मंडळांच्या विद्यार्थ्यांचे गुण व त्याचे पर्सेटाईल संस्थांसाठी त्यांच्या लॉग इन मार्फत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तरी प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम राबविणा-या व विनाअनुदानीत अल्पसंख्यांक तसेच अल्पसंख्यांक दर्जा असलेल्या संस्थांकडे संस्थास्तरावरील आणि अल्पसंख्यांक कोटयासाठी उमेदवार अर्ज करतात. अशा उमेदवारांची गुणवत्ता यादी शासनाच्या वरील कार्यपध्दतीनुसार करणे अनिवार्य आहे. अशा प्रकारच्या कार्यपध्दतीनुसार संस्थांकडे अर्ज केलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी सर्व संस्थांना त्यांच्या इन्स्टिटयूट कोडने लॉग इन केल्यानंतर पर्सेटाईल व नॉर्मलायझेशनची माहिती उपलब्ध होईल. त्या आधारे त्यांना उमेदवारांचे नॉर्मलायझेशनचे गुण दर्शविता येतील. तसेच राज्यातील सर्व अशासकीय विनाअनुदानीत अभियांत्रिकी संस्थेतील संस्थास्तरावर करण्यात येणा-या प्रवेशाकरिता देखील पर्सेटाईल बाबतची माहिती संस्थेच्या लॉगइनद्वारे उपलब्ध करून देण्यात येत आहे. अशा प्रकारे तयार केलेल्या संस्थास्तरावरील तसेच अल्पसंख्यांक कोटयातील गुणवत्ता यादी तपासणी विभागीय कार्यालयांकडून करण्यात येईल.

प्रवेशासंबंधीची सर्व प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत असल्याने प्रवेशास अधिनस्त असलेल्या सर्व विनाअनुदानीत बिगर अल्पसंख्यांक आणि अल्पसंख्यांक दर्जाच्या संस्थांकडून रुपये 10,000/-(अक्षरी रुपये दहा हजार फक्त) इतक्या रकमेचा संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई (मुंबई येथे देय असलेला ) यांचे नावे काढलेला धनाकर्ष प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानतर करावयाच्या गुणवत्ता यादी पडताळणी वेळी आपल्या कार्यालयाकडे प्रोसेसिंग शुल्क म्हणून सादर करणे आवश्यक राहील. सदर बाब आपल्या अधिनस्त असलेल्या उपरोक्त सर्व संस्थांना कळविण्यात यावी .

(डॉ.सुभाष महाजन)

संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

---

पृष्ठांकन/तंशिस/प्राकाना/शैवि/२०१४/ 2353

दिनांक:- 19 JUL 2014

प्रति,

संचालक/प्राचार्य

अभियांत्रिकी पदवी व अल्पसंख्यांक संस्था,

नागपूर विभाग, नागपूर

**उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार कार्यवाही करण्यांत यावी.**

(गुलाबराव ठाकरे)

सहसंचालक,

तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,

नागपूर.